| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ३४ /२०२३   दि. ०८/०३/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कोपरी वाहतूक उप विभागाचे हद्दीत भास्कर कट येथील चिखलवाडी शौचालयाचे समोरील रस्त्याचे मधोमध चिजल लागुन तुटलेल्या भुमिगत जलवाहीनीचे दुरुस्तीचे काम दि. ०८/०३/२०२३ रोजी रात्रौ २३:०० ते दि. ११/०३/२०२३ रोजी पहाटे ०६:०० वाजेचे दरम्यान करण्यात येणार आहे.

**ज्याअर्थी,** भास्कर कट येथील चिखलवाडी शौचालयाचे समोरील रस्त्याचे मधोमध चिजल लागून तुटलेल्या भुमिगत जलवाहीनी दुरुस्तीचे कामाचे वेळी सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी सुभाष बुरसे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०२, ठाणे शहर, अतिरिक्त कार्यभार, पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कोपरी सर्कल कडून भास्कर कट मार्गे तीन हात नाका कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना भास्कर कट येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** कोपरी सर्कल कडून भास्कर कट मार्गे तीन हात नाका येथे जाणारी वाहने ही भास्कर कट येथून संत नामदेव ब्रिज वरुन नौपाडा पोलीस ठाणे मार्गे तसेच संत नामदेव ब्रिज खालून टेलीफोन नाका मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) तीन हात नाका सर्व्हीस रोडने रघुवेल हॉटेल कडून भास्कर कट कडे येणा–या जड अवजड वाहनांना रघुवेल हॉटेल तीन हात नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. तसेच जड–अवजड वाहनासाठी भास्कर कट येथुन तीन हात नाका ठाणे येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मेन रोडने कोपरी ब्रिज मार्गे आनंदनगर चेक नाका येथील चौकी जवळून यु टर्न घेवून इच्छित स्थळी जातील. तसेच आकाराने लहान व हलकी वाहने रघुवेल हॉटेल कडून भास्कर कट कडे येणा–या सर्व्हीस रोडने सुचिता को. ऑप. सोसायटी येथून डावीकडे वळून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) तीन हात नाका येथील ब्रिज खालून व तीन हात नाका येथील ब्रिज वरुन भास्कर कट कडे येणा–या सर्व वाहनांना गुरुद्वारा कट येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मेन रोडने कोपरी ब्रिज मार्गे आनंदनगर चेक नाका येथील चौकी जवळून यु टर्न घेवून इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना दि. ०८/०३/२०२३ रोजी रात्रौ २३:०० ते दि. ११/०३/२०२३ रोजी पहाटे ०६:०० वाजेपावेतो लागू करण्यात येत आहे.

सदरची वाहतूक अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( सुभाष बुरसे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०२, ठाणे शहर,
अतिरिक्त कार्यभार,
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**<u>प्रत</u>** :– <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– <u>सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग.</u>
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner